# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/02/2024 (शनिवार) सकाळ

---

### नागपूर ग्रामीण पोलीसांची अवैध्य वाळु माफिया विरूध्द धडाकेबाज कार्यवाही

दिनांक २३/०२/२०२४ रोजी सकाळी ०४.४५ वा. दरम्याण पो.स्टे. हद्दीत गस्त चेकींग दरम्याण अवैध्य रेतीवर आळा घालण्या करीता पेट्रोलिंग करीत असतांना जुनी नारसिंगी पांदन रोडवर ०४ ट्रॅक्टर क्रमांक १) MH40 A-4070 व ट्रॉली २) MH 40 CQ-6983 व ट्रॉली ३) RTO पासींग नाही व ट्रॉली RTO पासींग नाही ४) RTO पासींग नाही ट्रॉली कमांक MH 32 A- 8995 व हे येतांना दिसले याचा पाठलाग करून जुनी नारसिंगी पांधन रस्ता गांवाजवळ त्यांना थांबवुन पाहणी केली असता वरील नमुद चारही ट्रॅक्टर मध्ये अंदाजे ४ ब्रॉस रेती मिळुन आल्याने सदर ट्रॅक्टर चालकास व मालकास ट्रॅक्टर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्यांनी रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्यांची खात्री झाल्याने वरील चारही ट्रॅक्टर मध्ये ०४ ब्रॉस रेती किंमत २०,०००/— रू व ट्रॅक्टर ट्रॉली किंमती २९,२५,०००/— रू असा एकुण २९,४५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून सदर ट्रॅक्टर चालक व मालक यांचे विरूध्द पोलीस स्टेशन अप कमांक ८०/२४ कलम ३७९, १०९ भादंवी सहकलम ४८(८), ४८(७) महा.ज.म.स. सहकलम, ४, २१ खाणी आणि खनिजे अधि. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक कायदा १९८४ अन्वये पोलीस स्टेशन जलालखेडा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक सा. (नागपूर ग्रा), मा. अपर पोलीस अधिक्षक सा. मा. उपविभागीय पोलीस अधि. सा. (काटोल वि. काटोल) यांचे मार्गदर्शनात जलालखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार सपोनि/सी.बी. चौहान साहेब PSI मनोज शेंडे साहेब, पोलीस अंमलदार हरीहर सोनोने रविंद्र मोहोड, निलेश खरडे संतोष क्षिरसागर व होमगार्ड सैनिकांच्या मदतीने करण्यात आलेली आहे.



## MIDC बुटीबोरी परीसरात सुरु असणाऱ्या वेश्याव्यवसायावर धाड टाकुन देहव्यापार करणाऱ्या ०२ पिडीत महिलांची सुटका करुन मुख्य आरोपीस केली अटक नागपूर ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई

MIDC बुटीबोरी पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहिती मिळाली आहे की, महिला आरोपी ही स्वत:चे आर्थीक फायदयाकरिता दोन महिलांना पैशाचे आमीश देवुन व विश्वासात घेवुन त्यांना देहव्यापार करण्यास प्रवृत्त करुन त्या दोन्ही महिलांना येणाऱ्या ग्राहकांना पुरवुन MIDC बुटीबोरी परीसरात असणाऱ्या AN Engineering कंपनीच्या बाजुस असणाऱ्या बंद आणि जुन्या कंपनीच्या हॉलमध्ये देहव्यापार करुन घेत आहे. अशी खात्रीशिर माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी पोलीस पथकाने जावुन छापा टाकुन पुढीलप्रमाणे कारवाई केली.

मिळालेल्या प्राप्त खबरेनुसार पोलीस पथकाने सदर ठिकाणी धाड टाकली असता आरोपी महिला व आरोपी आकाश कारेमोरे यांचे घराजवळ, ता. हिंगणा, जि. नागपुर यांचे विरुध्द कलम ३, ४, ५ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ अन्वये गुन्हा नोंद करुन महिला आरोपी हिला अटक करण्यात आली आहे. यातील पिडीत दोन महिलांना सुधारगृहात पाठविण्यात आले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा गायकवाड यांचे मार्गदर्शनात पोस्टे एमआयडीसी बोरी येथील ठाणेदार सहा. पोनि राजीव कर्मलवार सहा. पोनि सुमंतराज भुजबळ, पोउपनि राम खोत, पोलीस अंमलदार दिप पांडे, संतोष तिवारी, श्रीकांत गौरकार, निशा हंबरे यांचे पथकाने केली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**